माहे ऑगस्ट २०१६

# वसई विरार शहर महानगरपालिका

## ई-वार्ता

## स्वच्छ सर्वेक्षण २०१७ साठी कार्यशाळेचे आयोजन

दिनांक ०६ ऑगस्ट वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रथम महिला मा.महापौर सौ. प्रविणा ठाकुर, आयुक्त श्री. सतिश लोखंडे व स्थायी समिती सभापती श्री. नितीन राऊत यांनी दिप प्रज्जवलित करुन स्वच्छ सर्वेक्षण 2017 उद्घाटन केले. या कार्यक्रमास उपायुक्त श्री. अजिज शेख, प्रभाग 'ब' चे सभापती श्री. भरत मकवाना, स्वच्छता विभागाचे सहा. आयुक्त श्री. सुकदेव दरवेशी, प्रभाग 'के' चे सहा. आयुक्त तसेच नगरसेवकासह नागरीक उपस्थित होते. महानगरपालिकेच्या अधिका-यानां व नागरीकांना शहर स्वच्छ ठेवण्यासाठी आव्हान करण्यात आले.







# वसई विरार शहर महानगरपालिका

## ई- वार्ता

माहे ऑगस्ट २०१६

*वसई - विरारच्या प्रगतीसाठी प्रयत्नशील*

पापडी येथे हुतात्मा बाळा सांवत स्मारकात क्रांतीदिना निमित्त (ता. 9) मा.महापौर प्रविणाताई ठाकुर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी माजी आमदार डॉमनिक घोन्सालवीस, कामगार नेते मार्कुस डाबरे, स्थायी समिती सभापती नितीन राऊत, 'आय' प्रभागाचे सभापती प्रवीण शेट्टी, कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉमनिक डिमेलो, शहराध्यक्ष मायकल फुटर्याडो, वसई विकास बँकेचे उपाध्यक्ष श्री. जगदीश राऊत, न्यु इंग्लिश स्कुलचे प्राचार्य श्री. माणिक दुतोंडे तसेच बाजीपुर वनिता विद्‌यालय व म. ग. परुळेकर शाळेचे विद्‌यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

मा. महापौर यांनी यावेळी भाषण करताना महिला व बालकल्याण विभागात वसई विरार महापालिकेने प्रथम क्रमांक मिळविला असून या कामात आणखी प्रगती साधत पालिका देशात सर्व प्रथम कशी येईल यासाठी प्रयत्नशील असलेबाबत स्पष्ट केले.

# वसई विरार शहर महानगरपालिका

## ई - वा र्ता

### वसई विरार महानगरपालिकेच्या मोबाईल ॲपचे उद्घाटन.







वसई विरार शहर महानगरपालिकेने अद्यावत संकेत स्थळ सुरु असून दिनांक १५ ऑगस्ट २०१६ रोजीच्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून नागरिकांना सुविधा देण्यासाठी “व्ही ॲप” नामक मोबाईल ॲप सुरु केले आहे. व्ही ॲप नावाचे ॲप्लीकेशन पालिकेचे स्वतंत्र ॲप्लीकेशन असून स्वांतत्र्य दिनांचे औचित्य साधून 15 ऑगस्ट ला शुभांरभ करण्यात आला. मोबाईल प्ले स्टोअर्स मधून कुठल्याही ॲनड्रॉईड फोन मध्ये हे विनामुल्य डाऊनलोड करता येणार आहे.

या दवारे पालिकेचे विविध विभाग, विविध योजना, अधिकारी - नगरसेवकांचे क्रमांक, आपत्तकालीन यंत्रणेचे क्रमांक, शहरांची माहिती, नागरीकांना कुठल्याही प्रकारची सुचना तसेच तक्रारीची नोंदणी करणे शक्य आहे. तसेच ॲप च्या माध्यमातून नागरिकांना मालमत्ता कर, पाणीपट्टी कर भरणा करता येणार आहे. ॲप मुळे नागरीकांचा वेळ वाचण्या बरोबरच पालिकेबरोबर समन्वय साधणे सोयीस्कर होणार आहे.

ई-वार्ता

# वसई विरार शहर महानगरपालिका

माहे ऑगस्ट २०१६

## स्वातंत्र्यदिनी पोलिसांना सात वाहनांची भेट

वसई विरार शहरात सात पोलिस ठाणे असून त्यांच्याकडे प्रत्येकी एकच वाहन आहे. यामुळे गुन्हयांच्या तपासासाठी व बंदोबस्तासाठी पोलिसांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. पालघरच्या पोलिस अधिक्षक श्रीम. शारदा राऊत यांनी अडचण लक्षात घेऊन पालिकेला वाहने देण्याची विनंती केली. त्यानुसार मा. महापौर श्रीम. प्रविणा ठाकुर व आयुक्त श्री. सतीश लोखंडे यांनी ही मागणी मान्य केली.

स्वांतत्र्य दिनांचे औचित्य साधून पालिकेने पोलिसानां सात जीप दिल्या असून, तुळींज, वसई, नालासोपारा, विरार, वालीव, माणिकपुर, अर्नाळा सागरी या प्रमाणे सात जीप वितरीत करण्यात आल्या.

रस्त्यावर बेकायदेशीरपणे उभी केलेली वाहने उचलण्यासाठी पोलिसांना टोईंग वाहने सुद्धा लवकरच दिली जाणार आहेत.



**ई -वार्ता**

**माहे ऑगस्ट २०१६**

**वसई विरार शहर महानगरपालिका**


# चिखल डोंगरे तलावाचा लोकार्पण समारंभ

दिनांक १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून चिखल डोंगरे तलावाचा लोकार्पण समारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. सदर कार्यक्रमास मा.महापौर प्रविणाताई ठाकूर, मा.उपमहापौर श्री.उमेश नाईक, मा. आयुक्त सतिश लोखंडे, मा.श्री. क्षितीज ठाकूर, तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मा.श्री. हितेंद्र ठाकूर, मा.श्री. विलास तरे, मा.श्री. नारायण मानकर, मा.श्री. राजीव पाटील समवेत सभापती प्रभाग समिती 'अे', मा.श्री. पंकज ठाकूर, सभापती स्थायी समिती मा.श्री.नितीन राउत, नगरसेवक श्री. रणजीत पाटील तसेच अनेक नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.







# वसई विरार शहर महानगरपालिका

## अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापन विषयावर मार्गदर्शन

न्यु विवा कॉलेज, विरार (पश्चिम) येथे बुधवार दिनांक 24/08/2016 रोजी सकाळी 11:00 वा. डिप्लोमाच्या 200 विद्यार्थ्यांना वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागाणे, "अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापन" या विषयावर वसई विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाचे प्रभारी अग्निशमन अधिकारी श्री. दिलीप पालव यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास उपस्थितांना जिवसंरक्षक साहित्यांची माहिती देउन प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. सदर कार्यक्रमास विवा डिप्लोमा कॉलेज ऑफ इंजिनियरींग ॲन्ड टेक्नॉलॉजीचे प्रिंन्सीपल श्री.रविंद्र सोलापूरकर व शिक्षक वर्ग सौ. श्वेता वने, सौ.अक्षया प्रभु, सौ.मिनाक्षी गावकर, श्री.भरत वरुडे, सौ. अश्विनी संख्ये, श्री.मयुर जगताप, सौ. संपदा पवार, श्री.जिग्नेश पाटील हे उपस्थित होते. सदर कार्यक्रमास अग्निशमन विभागाचे अधिकारी व कर्मचारी वर्ग श्री. विजय कृष्णा राणे, श्री.अमोल विकास मर्दे, श्री.नंदकुमार दिगंबर शिंगरे, श्री.महेश सहदेव दळवी, श्री.रुपेश अनंत पाटील, श्री.कुलदिप मदन माळी, श्री.विवेक विष्णु घरत, श्री. पंकज सातवी, श्री.योगेश चव्हाण, श्री.वैभव सर्जेराव मोहीते यांनी सहभाग घेतला.







